-८१-
~~७५~~

शासकीय जमिनी

गायरान जमिनी मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक एलएनडी ४०८१/२०४००/सीआर १५३१-ग५,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २३ डिसेंबर १९८८.

परिपत्रक:

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५१ [१] मधील तरतूदीनुसार ग्रामपंचायतीकडे गुरचरणाच्या प्रयोजनासाठी निहीत झालेली गुरचरण जमीन इतर संस्थेस मंजूर करतांना, प्रथम ग्रामपंचायतीचा जमीन देणेबाबत संमतीदर्शक ठराव प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही प्रकरणांत ग्रामपंचायतीचा संमतीदर्शक ठराव प्राप्त करून न घेता, गायरान जमिनीचा आगाऊ ताबा काही संस्थांना ~~देणे~~ देण्यात येतो. तरी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी गायरान जमीन एखाद्या संस्थेला मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवितांना सदरहू जमिनीच्या वितरणाला संबंधीत ग्रामपंचायतीने संमती दिली आहे किंवा नाही हे प्रथम तपासावे. मात्र जमिनीचा आगाऊ ताबा देऊ नये.

२. हे परिपत्रक ग्रामविकास विभागाच्या अनुमतीने निर्गमित होत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[वि. श्री. ठकार]
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग.

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
-6 JAN 1989
नि. उ. जि. जिल्हाधिकारी

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त